साप्ताहिक
# परळी परिसर

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ०८ जुलै २०२४ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## जिल्ह्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ भगिनींना मिळवून देणार - ना.धनंजय मुंडे

परळी वैद्यनाथ, (बातमीदार):- महाराष्ट्र राज्यात नव्याने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कार्यान्वित केल्याबद्दल परळी वैद्यनाथ येथील जगमित्र कार्यालयामध्ये राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला पदाधिकारी तसेच परळीतील अनेक महिला भगिनींनी एकत्र येऊन सत्कार करत त्यांच्या माध्यमातून महायुती सरकारचे आभार मानले आहेत.

राज्य सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना असून याद्वारे आर्थिक दुर्बल कुटुंबातील महिला भगिनींना थेट दीड हजार रुपयांचे मासिक अर्थसहाय्य मिळणार आहे. या योजनेच्या माध्यमातून परळी वैजनाथ मतदारसंघासह बीड जिल्ह्यात जास्तीत जास्त महिला भगिनींना लाभ मिळवून देण्यासाठी सर्व महिला पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन यावेळी धनंजय मुंडे यांनी सर्व उपस्थित महिला पदाधिकाऱ्यांना केले आहे.



**६ तासांचा जनता संवाद :-** दरम्यान धनंजय मुंडे यांनी आपल्या जगमित्र या संपर्क कार्यालयात आज परळी ते बीड जिल्ह्यातील जनतेशी जनता संवाद उपक्रमाच्या माध्यमातून संवाद साधला. यावेळी नेहमीप्रमाणे असंख्य कार्यकर्ते व नागरिक आपले वेगवेगळे प्रश्न अडचणी व समस्या घेऊन धनंजय मुंडे यांना भेटले; तर शक्य त्या ठिकाणी लगेचच फोन करून किंवा संबंधितांना पत्र देऊन किंवा अन्य मार्गांनी संबंधितांची कामे मार्ग लावण्याचे काम धनंजय मुंडे यांनी केले. हजारावर नागरिक व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत आज दुपारी तीन वाजता सुरू झालेला जनता दरबार सायंकाळी नऊ वाजले तरीही सुरू होता..! ***

## रेल्वे दुहेरीकरणासाठी जमीन संपादनास परळीत विरोध करणार - सय्यद बहादूरभाई

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी-परभणी रेल्वे दुहेरीकरणासाठी जमीन संपादनाबाबत दक्षिण मध्य रेल्वेचे गॅझेट गत दोन दिवसापासुन सोशल मिडीयावर व्हायरल होत असुन यामध्ये नागरी वस्तीतील अनेकांच्या घरांचा समावेश आहे. रेल्वे प्रशासनाचा हा निर्णय चुकीचा असुन याबाबत नागरीकांच्या हरकती नोंदवुन संपादनाची जागा नागरी वस्तीऐवजी महानिर्मीती किंवा मोकळी जागा घ्यावी
यासाठी आंदोलन करण्याचा इशारा कॉंग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनिफ उर्फ बहादुरभाई यांनी दिला आहे.

परळी शहरात विकाराबाद व परभणी असे दोन मार्ग एकत्रित येतात. यातील दक्षिण मध्य रेल्वेच्या वतिने परभणी-परळी रेल्वे दुहेरीकरणासाठी जमीन संपादनाची



प्रक्रिया सुरु केली आहे. सदरील जमीन संपादनाबाबतचे गॅझेट सोशल मिडीयावर व्हायरल होत असल्याने शहरातील आझाद नगर, इंदिरा नगर, स.नं.७५ मधील नागरीकांमध्ये गोंधळ उडाला आहे. कॉंग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनिफ उर्फ बहादुरभाई यांनी या भागातील नागरीकांना सोबत घेत पत्रकार परिषद घेवुन रेल्वे विभागाच्या या प्रक्रियेस विरोध दर्शवला. रेल्वे दुहेरीकरणासाठी नागरी वस्तीतील जमीन संपादनाची गरज नसुन यासाठी सध्या निकामी करण्यात आलेल्या औष्णीक वीज निर्मिती केंद्राच्या कर्मचार्यांच्या निवासस्थानाची जागा आहे किंवा यासाठी परळी-बीड-नगर रेल्वे मार्गावरील टोकवाडी शिवारात शेतजमीन उपलब्ध आहे परंतु रेल्वे विभागाकडून हट्टापायी नागरी वस्ती संपादित करण्यात येत आहे. संपादनाची ही प्रक्रिया होत असताना तत्कालीन खासदार, जिल्ह्याचे पालकमंत्री यांना कल्पना असतानाही त्यांनी यासाठी काहीच केले नाही.रेल्वेने या भागातील घरे संपादित केली तर असंख्य कुटुंब बेघर होणार असल्याने यास आमचा विरोध असुन हे संपादन होवु नये यासाठी नागरीकांच्या हरकती नोंदवुन महसुल व रेल्वे प्रशासनाकडे दुसरी पर्यायी जागा निवडण्याची मागणी करणार आहे. यानंतरही सदरील जमीन संपादन होत असेल तर नागरीकांना सोबत घेवुन आंदोलन करणार असल्याचे कॉंग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनिफ उर्फ बहादुरभाई यांनी या पत्रकार परिषदद्वारे दिला आहे. ***

## राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून सौ.सुदामतीताई गुट्टे परळी विधानसभेची निवडणूक लढवणार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) च्या ज्येष्ठ नेत्या व सामाजिक कार्यकर्त्या सुदामतीताई गुट्टे परळी विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवणार असून याबाबत पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचीही त्यांनी भेट घेतली आहे. त्यांनी कामाला लागा अशा सूचनाही दिल्या आहेत अशी माहिती सुत्रांकडून मिळाली यास श्रीमती गुट्टे यांनी दुजोरा देवून आपण कामाला लागलो असल्याचे स्पष्टपणे सांगितले.



गेल्या पंधरा वर्षापासून श्रीमती गुट्टे राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सक्रीय व निष्ठावान कार्यकर्त्या आहेत. शिवाय परळीच्या सामाजिक कार्यातही त्या अग्रेसर आहेत. परळी विधानसभा मतदार संघात पक्षाची ताकद वाढावी म्हणून त्यांनी मोठे प्रयत्न केले आहेत. सर्वसामान्य कार्यकर्ते, नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्या सदैव तत्पर असतात. परळी मतदार संघातील उस उत्पादक शेतकऱ्यांना गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी मोठी मदत केली आहे. परिसरातील कारखाने बंद पडल्यामुळ ज्या शेतकऱ्यांचा ऊस कोणीही गाळपास नेण्यास तयार नव्हते, त्या काळात सौ.गुट्टे यांनी अशा शेतकऱ्यांचा ऊस गंगाखेड शुगर या आपल्या कारखान्याकडे गाळपाला नेवून शेतकऱ्यांना मोठा आधार दिला आहे. मतदार संघातील शेतकरी व कष्टकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्या नेहमी कटिबद्ध असतात. परळी तालुक्यात सामाजिक कार्यातही त्यांनी आपल्या कामातून ठसा उमटविला आहे. आडल्या नडलेल्यांना मदत करणे, सर्वसामान्यांचे सरकार दरबातील प्रश्न सोडविणे, नागरी समस्या सोडविणे असे विविध सामाजिक उपक्रमही त्यांनी राबविले आहेत.

मतदार संघात वेळोवेळी केलेल्या विविध कामाचा अहवाल त्या पक्षश्रेष्ठींकडे पाठवत असतात. त्यामुळे पक्षीय राजकारणात त्यांचा प्रभाव आहे. आगामी विधानसभेच्या निवडणुकीसाठी परळी विधानसभा मतदार संघातून त्यांच्या उमेदवारीबाबत पक्षश्रेष्ठींनी हिरवा कंदिल दाखवला आहे. काही महिन्यांपूर्वी सौ.गुट्टे यांनी पक्षाध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांची भेट घेवून याबाबत चर्चाही केली होती. त्यांनी कामाला लागा अशा सूचनाही दिल्या होत्या. दरम्यान, लोकसभा निवडणुकीनंतर बीड जिल्ह्यात मिळालेल्या यशामुळे पक्षाची ताकद वाढली आहे. या निवडणुकीत केलेल्या कामाचा अहवालही त्यांनी पक्षाकडे पाठवला आहे. खासदार सुप्रियाताई सुळे, आमदार रोहितदादा पवार यांचीही त्या भेट घेवून आल्या आहेत. या नेत्यांनीही उमेदवारीबाबत सकारात्मक प्रतिसाद देवून तयारी करा असे आपल्याला सांगितले आहे. यामुळे आपण कामाला लागलो आहोत असे सौ.गुट्टे यांनी रविवारी (दि.७) पत्रकारांशी बोलताना सांगितले. यावेळी पक्षाचे तालुकाध्यक्ष देवराव लुगडे, शहराध्यक्ष ॲड.जीवनराव देशमुख उपस्थित होते. ***

## महाराष्ट्राला 'सर्वोत्कृष्ट कृषी राज्य' पुरस्कार!

### ११ जुलै रोजी होणार दिल्लीत वितरण; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कृषीमंत्री धनंजय मुंडे स्वीकारणार पुरस्कार

मुंबई (प्रतिनिधी):- माजी सरन्यायाधीश, केरळचे राज्यपाल न्यायमूर्ती पी. सथाशिवम यांच्यासह १५ जणांच्या अध्यक्षतेखालील कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने महाराष्ट्र राज्याला २०२४ सालचा 'सर्वोत्कृष्ट कृषी राज्य' पुरस्कार देण्याची घोषणा केली आहे. येत्या ११ जुलै रोजी दिल्लीतील हॉटेल हॉलिडे इन मध्ये १५ व्या 'एग्रीकल्चर लीडरशिप कोन्क्लेव्ह'मध्ये या पुरस्काराचे वितरण केले जाणार असून राज्य सरकारच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच कृषिमंत्री धनंजय मुंडे हा पुरस्कार स्वीकारणार आहेत. एग्रीकल्चर टुडे च्या वतीने या पुरस्काराची सुरुवात २००८ सालापासून करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने मागील वर्षात पर्यावरणाच्या संरक्षणासह अन्नसुरक्षा, सर्वात मोठी बांबू लागवड, तृणधान्य अभियान, औष्णिक वीज निर्मितीत बायोमास चा वापर यांसारखे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले असून १.७ दशलक्ष हेक्टर क्षेत्राचे १२३ मेगा सिंचन प्रकल्प, पंतप्रधान किसान सन्मान निधी दुप्पट करणारे देशातील पहिले राज्य, त्याचबरोबर ४.६३ लाख शेतकऱ्यांना नॅनो युरिया व नॅनो डीएपी खतांचे वितरण, सूक्ष्म बाजरी कार्यक्रम, डाळींच्या उत्पादनात देशात अव्वल स्थान, तसेच एक रुपयात पिक विमा योजना राबवणारे देशातील एकमेव राज्य असे अनेक उपक्रम यशस्वीरित्या राबवले आहेत. यामुळे लाखो शेतकऱ्यांवर सकारात्मक परिणाम झाला असून ग्रामीण कृषी क्षेत्रातील समृद्धीला लक्षणीय चालना मिळाली असल्याचे पुरस्कार समितीचे निष्कर्ष आहेत. कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण धोरणे आणि उच्च प्रभावी विकासात्मक उपक्रमांद्वारे कृषी आणि ग्रामीण समृद्धीच्या प्रगतीसाठी महाराष्ट्राच्या विशेष योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात येत आहे.

एग्रीकल्चर लीडरशिप कॉन्क्लेव्ह या परिषदेत प्रमुख भागधारकांचा मेळावा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग विकास मंत्री नितीन गडकरी, यांच्यासह केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, ब्राझील, अल्जेरिया, नेदरलँड इत्यादी देशांचे राजदूत, तसेच महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, नागालँड आदी राज्यांचे मंत्री यांचा समावेश असणार आहे.

२००८ साली या पुरस्काराची प्रथम सुरुवात करण्यात आली असून कृषी क्रांतीचे प्रणेते प्रा एम एस स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखालील पुरस्कार समितीने सर्वात पहिल्यांदा हा पुरस्कार आंध्र प्रदेश या राज्याला प्रदान केला होता. आतापर्यंत या पुरस्काराने माजी कृषिमंत्री शरद पवार, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान, अखिलेश यादव, दिवंगत नेते प्रकाश सिंह बादल, वर्गीस कुरियन, एम एस स्वामीनाथन इत्यादी महानुभावांचा गौरव करण्यात आलेला असून स्व. स्वामीनाथन यांनी दहा वर्ष या संस्थेचे अध्यक्षपद भूषविलेले आहे. तर सध्या डॉ. एम.जे. खान हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत.

२०२३ सालचा सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार बिहार तर २०२२ सालचा तमिळनाडू आणि उत्तर प्रदेश या राज्यांना हा पुरस्कार देण्यात आला होता. ***

# संत नामदेव महाराज पालखी रिंगण सोहळ्याला परळीत मोठा प्रतिसाद

परळी वैजनाथ (बातमीदार):- आषाढी एकादशीच्या निमित्याने नर्सी नामदेव येथून पंढरपूरसाठी निघालेल्या संत नामदेव महाराजांच्या पालखीचे तीर्थक्षेत्र परळी वैजनाथ नगरीत आज शुक्रवार दिनांक ५ जुलै रोजी आगमन रिंगणत ४ वाजता झाले. टाळ, मृदंगाच्या निनादात पालखी मुख्य मार्गाने मार्गक्रमण करीत असताना मंगलमयी वातावरणाने परिसर भारून गेला होता. तर पालखीचा रिंगण सोहळा नेत्रदीपक ठरला.अ.भा.वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे व त्यांच्या सहकार्यांच्या वतीने हा पालखी सोहळयाने भव्य दिव्य डोळयांचे पारणे फेडणारा रिंगण सोहळा परळीकरांनी पाहिला.

संत नामदेवांच्या जन्मस्थळापासून निघालेल्या पालखीचे पंढरपूरपर्यंत जाण्यासाठी एकूण २२ टप्पे होतात. यातील एक टप्पा हा पंचम ज्योतिर्लिंग परळी वैजनाथ येथे आहे. परळी वैजनाथ नगरीत दुपारी पालखी दाखल झाली होती. अ.भा.वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे व त्यांच्या सहकार्यांच्या वतीने पालखीचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. ठिकठिकाणी महिलांनी पूजा करून पालखीचे दर्शन घेतले. विविध मान्यवरांनीही पालखीच्या स्वागतासाठी हजेरी लावत दर्शन घेतले. हाती भगवी पताका घेवून अगदी शिस्तीत जाणारे वारकरी, टाळ -मृदंगाचा गजर यामुळे भक्तीमय वातावरण झाले होते.

त्यानंतर नाथरोडवरील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जत्रा मैदानावर पालखी पोहोचली. तेथे वारकर्यांनी भजने गात सर्वांचीच मने जिंकली. तर रिंगणामध्ये मानाचा असलेला संत नामदेव महाराज यांचा अश्व धावल्यानंतर इतर अश्व धावले. तर घोडेस्वारांनी यावेळी विविध कवायती सादर केल्या. काळजाचा ठोका चुकविणार्या या कवायती टिपण्यासाठी अनेकांचे कॅमेरे सरसावले होते. या कार्यक्रमास अ.भा.वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे व त्यांच्या सहकार्यांनी व नगर परिषद, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या



कर्मचार्यांनी अथक परिश्रम घेतले. एकंदरीत ज्ञानोबा माऊलीच्या जयघोषाने परळी वैजनाथ नगरी दुमदुमली होती. पालखीचे स्वागत करण्यासाठी विविध राजकीय, सामाजिक धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील सदस्य, पदाधिकारी मंडळी तसेच परळी शहर व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाली होती. 'पांडुरंगाच्या द्वारी; आरोग्याची वारी' या संकल्पनेतून परळी उपजिल्हा रुग्णालयाच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक अरुण गुट्टे यांच्या सौजन्याने व अ.भा.वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह भ प श्री रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ सुमारे १५०० वारकऱ्यांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. यावेळी संत शेष्ठ श्री नामदेव महाराज यांच्या पालखीतील सर्व वारकऱ्यांना उपजिल्हा रुणालयाच्या वतीने मोफत औषधे देण्यात आली.अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळ महिला मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांकडून दिंडीतील वारकरी महिलांचे ही स्वागत करण्यात आले रिंगण सोहळ्यास विविध महिला भजनी मंडळानी व कन्हैया अध्यात्मिक वारकरी संस्थेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन रिंगण सोहळ्यात सहभाग घेतल्यामुळे रिंगण सोहळा नेत्रदिप झाला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने वारकऱ्यांना लिंबू सरबत चे वाटप करण्यात आले. सर्वांचे स्वागत तालुकाध्यक्ष विश्वांभर महाराज उखळीकर व आशोक महाराज कराळे यांनी केले तर आभार जिल्हाध्यक्षा सौ.राधिकाताई जायभाये व जिल्हा सचिव सौ.चेतनाताई गौरशेटे यांनी आभार मानले.



## सेवानिवृत्तीबद्दल श्री हरंगुळे यांचा सत्कार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील वैद्यनाथ शिक्षण संस्थेच्या वैद्यनाथ विद्यालयाच्या प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रमाकांत हरंगुळे शाळेतील प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले असून संस्था, शिक्षक व मित्र परिवाराच्या वतीने त्यांचा सेवानिवृत्तीबद्दल सत्कार करण्यात आला.

शाळेच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमास महाराष्ट्र वीरशैव सभेचे तालुकाध्यक्ष महादेव ईटके, संस्थेचे हरीश देशमुख, माजी मुख्याध्यापक रामलिंग राजनाळे, सुशील हरंगुळे, सचिन स्वामी, भैय्या चौंडे, दत्ता गोपनपळे, बंडू चौंडे, भगवान कापसे, संजय चौंडे, कल्पेश पाथरकर, श्याम फडकरी यांच्यासह शाळेतील शिक्षक, मित्र परिवार, श्री हरंगुळे यांचे कुटुंबिय, नातेवाईक, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. श्री हरंगुळे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून संपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी श्री हरंगुळे यांच्या कार्याचे कौतुक केले. सेवेत असताना ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य केले, त्यांचे ऋण श्री हरंगुळे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. ***

## कर्जदारांनी दंडव्याज माफीचा लाभ घ्यावा

बीड, (जि.मा.का.):- महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या खादी आयोग निधी व कन्सोर्टियम बँक फायनान्स या दोन्ही योजनांसाठी मंडळाने खादी आयोगाचे परिपत्रक क्र. फायनान्स/ पॉलीसी/ १/ २००२-०३ दि. २८/०२/२००३ व परिपत्रक क्र. अका/एमएमएच. केव्हीआयबी/२२-२३ दि.२९/४/२०२२ अन्वये दंडव्याज माफी जाहिर केली आहे.

बीड येथे प्रस्तुत योजनेचे थकीत कर्जदार आहेत. कर्जदाराने एकरकमी भरणा केल्यास दंडव्याज माफी संबधितांना लागू होणार आहे. तरी कर्जदारांनी या दंडव्याज माफीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बीड यांनी केले आहे.*

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी पालकांनी सहकार्य करावे-श्री शिंदे

परळी वैजनाथ, (बातमीदार):- विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी शाळा, शिक्षकांबरोबरच पालकांचीही भूमिका तेवढीच महत्वाची आहे, पालकांनी आपल्या पाल्याच्या शैक्षणिक विकासासाठी शाळेला सहकार्य करावे असे आवाहन येथील उर्जानगर वसाहतीतील नवीन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक डी.जी.शिंदे यांनी केले.

या शाळेच्या संस्थेच्या वतीने अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या 'प्रगत व प्रगतीशील विद्यार्थी' या उपक्रमांतर्गत शाळेत गेल्या शनिवारी (दि.६) आयोजित करण्यात आलेल्या पालक मेळाव्यात श्री शिंदे



बोलत होते. मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ शिक्षक प्रकाश चाटे, पालक प्रतिनिधी सौ.अश्विनी होनराव, श्री दराडे, श्री बडे, शाळेतील जेष्ठ शिक्षक एल.आय.वाकडे यांच्यासह शिक्षक, पालक उपस्थित होते.

श्री शिंदे म्हणाले, स्पर्धेच्या युगात विद्यार्थी यशस्वी व्हावा, त्याची गुणवत्ता वाढावी, यासाठी आमच्या संस्थेने अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रगत व प्रगतशील हा उपक्रम सुरू केला. त्यास विद्यार्थ्यांचा प्रतिसादही चांगला मिळतो आहे, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास मदत होणार आहे, त्यामुळे या उपक्रमाला पालकांनी सहकार्य करावे असेही श्री शिंदे म्हणाले. प्रास्ताविक भागवत मुंडे यांनी केले. उपस्थित पालकांनीही या उपक्रमाबद्दल आपल्या प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करुन संस्थेच्या उपक्रमाचे कौतुक केले. सौ.अश्विनी होनराव, श्री निरडे, श्री चाटे, श्री वाकडे आदींनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन सौ.जाधव यांनी तर आभार प्रदर्शन श्रीरामे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ.निटुरे, विनोद देशमुख, श्री चौरे, सौ.गादेकर, श्री जाधव, श्री जगताप, सौ.गंगणे आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले. ***

# वारकऱ्यांसाठी खुशखबर! आषाढी वारीनिमित्त धावणार विशेष रेल्वे गाड्या

अमरावती (बातमीदार):- आषाढी एकादशीनिमित्त विदर्भातून पंढरपूर येथे मोठ्या संख्येने भाविक जातात. त्यामुळे आषाढी वारीच्या काळात प्रवाशांची मोठी गर्दी होते. ही गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वेने विशेष गाड्या सोडण्याचे नियोजन केले आहे. मध्य रेल्वे नागपूर-मिरज (दोन गाड्या), नवीन अमरावती-पंढरपूर, खामगाव-पंढरपूर, भुसावळ-पंढरपूर, या 'पंढरपूर आषाढी एकादशी' विशेष गाड्या चालवणार आहे.

नवी अमरावती-पंढरपूर (४ सेवा) ०१११९ विशेष गाडी नवी अमरावती येथून १३ आणि १६ जुलैला २.४० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी ९.१० वाजता पंढरपूरला पोहोचेल, तर ०११२० विशेष गाडी पंढरपूर येथून १४ आणि १७ जुलैला ७.३० ला सुटून दुसऱ्या दिवशी १२.४० वाजता नवी



अमरावती येथे पोहोचेल. दोन तृतीय वातानुकूलित, ७ शयनयान, ७ सामान्य डबे असतील. बडनेरा, मूर्तीजापूर, अकोला, शेगाव, जलंब, नांदुरा, मलकापूर, बोदवड, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड आणि कुर्डूवाडी थांबे आहेत.

**खामगाव ते पंढरपूर विशेष :** गाडी क्र. ०११२१ विशेष खामगाव येथून १४ आणि १७ जुलैला ११.३० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी ३.३० वाजता पंढरपूरला पोहोचेल. गाडी क्र. ०११२२ पंढरपूर येथून १५ आणि १८ जुलैला ५ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी ७.३० वाजता खामगावला पोहोचेल. २ तृतीय वातानुकूलित, ७ शयनयान, ७ जनरल डबे असतील. जलंब, नांदुरा, मलकापूर, बोदवड, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुर्डूवाडी येथे थांबे आहेत. यामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

**भुसावळ ते पंढरपूर गाडी :-** गाडी क्र. ०११५९ विशेष गाडी भुसावळ येथून १६ जुलैला १.३० सुटून दुसऱ्या दिवशी ३.३० वाजता पंढरपूरला पोहोचेल. गाडी क्र.०११६० पंढरपूर येथून १७ जुलैला १०.३० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी १ वाजता भुसावळला पोहोचेल. जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुर्डूवाडी येथे थांबा आहे. या गाडीला ५ शयनयान, ११ जनरल सेकंड क्लासचे डबे असतील, असे प्रशासनाने सांगितले.

**नागपूर-मिरज विशेष गाडी :-** ०१२०५ नागपूर-मिरज विशेष (२ सेवा) गाडी १४ जुलैला सकाळी ८.५० वाजता नागपूर येथून सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ११.५५ वाजता मिरजला पोहोचेल. तर ०१२०६ गाडी मिरज येथून १८ जुलैला दुपारी १२.५५ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी १२.२५ वाजता नागपूरला पोहोचेल. एक तृतीय वातानुकूलित, ८ शयनयान, ७ सामान्य डबे असतील. ०१२०७ नागपूर- मिरज (२ सेवा) १५ जुलैला नागपूरहून सकाळी ८.५० वाजता सुटेल. दुसऱ्या दिवशी ८ वाजता मिरज येथे पोहोचेल. तर ०१२०८ मिरज येथून १९ जुलैला दुपारी १२.५५ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी १२.२५ वाजता नागपूरला पोहोचेल. दोन तृतीय वातानुकूलित, १४ शयनयान डबे असतील. या सर्व गाड्यांना अनुक्रमे अजनी, वर्धा, पुलगाव, धामणगाव, चांदूर, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुर्डूवाडी, पंढरपूर हे थांबे आहेत. ***

संपादकीय...

# बंदी नावा पुरतीच..!

**-० सुविचार ०-**
मनात ध्येयाची उर्मी असेल तर पायात धावण्याची गती येते.

जागतिक तापमान वाढीस कारणीभूत ठरणारे, मानवी आरोग्यास अपायकारक असणारे, मुक्या प्राण्याच्या जिवीतास बाधा असणारे प्लास्टीक बंद करण्याचा धाडसी निर्णय गेल्या मार्च-एप्रिल २०१८ ला राज्य सरकारने घेतला होता. पुढे म्हणजे जुलै २०२२ ला केंद्र सरकारनेही देशात सिंगलयूज प्लास्टीक बंदीचा निर्णय घेतला व त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून संबंधित प्रशासकीय यंत्रणेला सुचना दिल्या होत्या. ज्या प्लास्टीकचा वापर एकदाच होणार आहे व वापरानंतर ते निरुपयोगी ठरणार आहे. अशा प्लास्टीकच्या वस्तू ज्यात प्लेटस्, कप, पेले, फोर्क चमचे, चाकू, इअरबडस्, प्लास्टीकचा वापर केलेले मिठाईचे खोके, निमंत्रण पत्रिका, शंभर मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे प्लास्टीक, कॅरीबॅग, पीव्हीसी फलक, प्लास्टीकचे झेंडे, कॅन्डी कव्हर, आईस्क्रीम स्टीक्स, थर्माकोल, प्लास्टीकच्या प्लेटस आदीच्या वापरावर बंदी घातली गेली. या बंदीची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी केंद्रीय प्रदूषण मंडळांसह इतर संबंधित यंत्रणा नियंत्रण ठेवणार असे बंदी घातल्यानंतर सरकारतर्फे जाहीर करण्यात आले. केंद्र सरकारच्या या बंदीची महाराष्ट्र राज्यातही प्रभावी व काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी म्हणून संबंधित यंत्रणेला सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच प्लास्टीक लेपीन आणि प्लास्टीकचा थर असलेल्या उत्पादनांवर राज्यात बंदी असेल अशी घोषणा या सूचना देताना राज्य सरकारच्या वतीने केली गेली. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून राज्य सरकारने एका समितीचीही स्थापना केली. या समितीने ७ जुलै २०२२ ला घेतलेल्या बैठकीत विविध निर्णय जाहीर केले. पुढे याची अधिसूचना पंधरा जुलै २०२२ ला काढली गेली.प्लास्टीक लेपीत व थर असणाऱ्या उत्पादनांवर संबंधित वस्तूच्या वापरावर बंदी जाहीर केली. गावा-गावात दररोज जमा होणाऱ्या कचऱ्यातून प्लास्टीकचा कचरा कमी करणे तसेच या कचऱ्याचे विघटन होत नसल्याने व त्याच्यावर पुन्हा प्रक्रिया करणे शक्य नसल्याने राज्य शासन हा निर्णय घेत असल्याचे या अधिसूचनेत नमुद करण्यात आले.

प्लास्टीक बंदीचा निर्णय होऊन आज दोन वर्षे उलटली आहेत. परंतु आजही बंदी घातलेल्या प्लास्टीकच्या वस्तुंचा सर्वत्र सर्रास वापर होताना दिसतो आहे. बाजारात भाजी कॅरीबॅग मधूनच दिली जाते. किराणा दुकानदार कॅरीबॅग मधूनच सामान देतो आहे. चहाच्या टपरीवर ग्राहकांना प्लास्टीकचा थर असलेल्या कपातून चहा प्यावा लागतो आहे. समारंभातील जेवणावळीत थर्माकोल, प्लास्टीकचा थर असलेल्या द्रोण, पत्रावळ सर्रास वापरताना दिसताहेत. पानटपरीवर विड्याचे पान प्लास्टीकच्या कव्हरमधूनच दिले जात आहे. सजावटीसाठी तसेच इतर कामासाठी घरोघरी प्लास्टीक बरोबरच थर्माकोलचा वापर होतो. मग या वस्तूवर बंदी कसली? हा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो आहे. सरकारच्या बंदीच्या निर्णयानंतर सुरूवातीचे काही दिवस नगर पालिका, ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना बाजारात फिरून कॅरीबॅग गोळा केल्या पण पुढे काहीच केले नाही. बंदी घातलेल्या प्लास्टीकच्या वस्तुचा आज सर्वत्र व सर्रास वापर सुरू आहे. मग ही कसली बंदी? प्लास्टीक मानवी जीवीतास किती घातक आहे, जागतिक तापमान वाढीसाठी कारणीभूत आहे हे कळूनही लोक याचा वापर करतात याचे आश्चर्य वाटते. बंदी घालताना सरकारनेही या वस्तुंना पर्याय उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. पण असे होताना दिसत नाही. राज्य सरकारने राज्यात गुटखा बंदीचा निर्णय घेतला परंतु खरच राज्यातला गुटखा बंद झाला का? बंदीच्या नावाखाली थोड्या कारवाया व खुप कमया मात्र सुरू झाल्या. तसे प्लास्टीकचा आता गुटखा होऊन बसला आहे. ***

# आषाढस्य असे प्रथम दिवसे!

साऱ्यांनाच उत्सवाची चाहुल देणा-या आपल्या उत्सव परंपरा जपणाऱ्या देशांमध्ये सर्व रिती आणि परंपरा या पावसाशी निगडित आहेत आणि त्यावर आधारित जीवनपद्धती आपण आजवर जगत आलेलो आहोत.

मौसमी हवामानाच्या प्रदेशात असणाऱ्या भारत देशात आजही मातीशी नातं सांगणारी जीवनशैली आहे. गेल्या ५० वर्षात मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालं याचा परिणाम म्हणून नव्या पिढीची ग्रामीण भागाशी असलेली नाळ तुटली आहे हे देखील नाकारता येणार नाही मात्र जुनी पिढी आजही ग्रामीण जीवन आणि त्यातील गोडवा जपताना आपणास दिसेल.

ग्रामीण जग हे शेती आधारित वेगळं असं विश्व आहे. जून महिन्यात मृग लागल्यानंतर होणारी ती पेरण्यांची लगबग स्थिरावण्याचा आणि एकूणच आलेला पाऊस देखील स्थिर होण्याचा काळ म्हणजे आषाढाचा महिना याला ग्रामीण भागात आघाडाचा मास असंही म्हणतात.

संस्कृत महाकवी कालिदास यांनी लिहिलेलं 'आषाढस्य प्रथम दिवसे' हे विरह काव्य सर्वांना माहीत आहे. या काव्याच्या भाषिक आणि साहित्यिक मूल्याची वेगळी मांडणी होऊ शकेल आणि ती होते देखील मग आपल्या प्रियतमेला मेघांच्या माध्यमातून संदेश देण्याची ती कल्पना आणि त्या मागील वेदना मला अधिक महत्त्वाची वाटते. घरापासून दूर राहताना मनातल्या भावना काय आहेत हे संदेशाद्वारे मेघांनी अर्थात दाट गर्दी करून वाहणाऱ्या ढगांनी तिच्यापर्यंत न्याव्यात ही मूळ कल्पना.

कवी कालिदास आणि त्यांचं काव्य पुढे विविध प्रकारे सर्वच भाषिक साहित्यांत उतरलं आणि केवळ भाषांतरापुरतं मर्यादित न राहता त्या काव्याच्या प्रेरणेतून अनेक साहित्यिक कलाकृती नंतरच्या काळात निर्माण झाल्या. मूळ भावना आणि अशय समान असला तरी त्याला प्रत्येकाने आपापल्या परीने वेगळं शब्दांचं कोंदण दिलय.

मराठी प्रमाणेच हिंदीत आणि विशेषत: उर्दू भाषेत यावर आधारित रचना व मोठ्या प्रमाणावर आपल्यासमोर आल्या. आपल्याकडे चित्रपट सृष्टीच्या माध्यमातून देखील यात सातत्याने भर पडलेली आहे.

तसं नाही म्हणायला पाऊस आणि कविता हे एक आगळं नात आहे. पावसाच्या सरी कमी पडतील इतका भावनांचा पाऊस कवी आपल्या शब्दांना गुफूंन कवितेच्या माध्यमातून याच काळात पाडत असतात. त्यात पाऊस काव्य, पाऊस गाणी असा विचार करताना वयानुसार पाऊस आणि माणसाचं त्यासोबतचं नातं कसं बदलत जातं याचाही अनुभव आपणास सर्वच भाषिक साहित्यात दिसेल. पावसाच्या पडणाऱ्या प्रत्येक थेंबासोबत मानवी भावना जोडल्या गेल्या आहेत. मुळात पावसाची कल्पना वेगळी आणि त्यात चिंब होऊन आनंद मिळवणं वेगळं.

प्रेमात असणाऱ्यांना तर पावसाळा म्हणजे एक पर्वणी नानाविध कल्पना सुचतात आणि त्या शब्दात बांधण्याचा प्रयत्न होतो. शब्दांची गुंफण चांगली जमली असेल तर त्याला सूर आणि ताल यातून संगीताचा साज चढवला जातो. एकूणच काय तर पाऊस अंगणात कमी आणि मनामनात आणि वहीच्या पानापानात आधिक पडतो.

त्याची ती आणि तिचा तो सोबत असतील तर छत्री बाजूला टाकून धुंद होत पावसात चिंब चिंब होणं आवर्णनीय ठरतं. त्यात असणारा गोडवा आणि प्रीतीची अनुभूती सहजरित्या समोर येते मात्र ज्यांच्या जोडीदार सोबत नाही त्याचं विरहगान पावसाच्या प्रत्येक सरीसोबत नव्याने बरसत असतं. प्रीतीची अनुभूती आणि सोबत्याची अनुपस्थिती पावसाच्या थेंबा सोबतच आसवांचा देखील पाऊस आणते आणि या विरहाची किनार असणारी गाणी अधिक लोकप्रिय आहेत कारण त्या स्थितीत राहणारे आपल्या भावनांचा प्रतिबिंब शब्दाच्या या आरशात बघत असतात.

आषाढ महिन्याचा पहिला दिवस एक निमित्त साधत महाकवी कालिदास यांनी केलेली रचना त्यामुळे शब्दांपलिकडचा प्रवास घडवते आणि म्हणतात ना More you write personal more it will become universal ही वैश्विक भावना जागवणारा दिवस अर्थात आषाढस्य प्रथम दिवसे.!

**- प्रशांत विजया अनंत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड
चलभाषा क्र.९८२३१९९४६६

## कृषकाचे जिणे...

कृषकाचे जिणे
माळ रानापरी
पाश सावकारी
सदोदित ।
हिरवं सपन
करितो पेरणी
संसार भरणी
रिकामीच ।।
करपली पिके
करपलं जिणं
जीवनाचं गाणं
बेसूरात ।।
दुष्काळाची सल
स्वप्नांचा पाचोळा
फिरविला बोळा
स्वप्नावरी ।।
आस जीवनात
कोरा सातबारा
दुःखाचा तो पारा
वाढलेला ।

**-प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड,**
परळी वैजनाथ.

**सा.परळी परिसर चे वार्षिक वर्गणीदार व्हा!**
-० अंकासाठी संपर्क ०-
मो.९४२२३२८४९३

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
* वर्ष ०८ * अंक ०९ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ०८ जुलै २०२४ * किंमत : २ रु.

# बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून परळीतील ११३ बांधकाम कामगारांना गृहउपयोगी संचाचे वाटप

## कामगार मंडळाने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी वाटप करावे-प्रा.बी.जी.खाडे



परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटनेने (लालबावटा) नोंदी केलेल्या ११३ बांधकाम कामगारांना गृहउपयोगी संचाचे (भांडे) मंडळाकडून बीड येथे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्फे बांधकाम कामगारांना सुरक्षा(पेटी) व गृहउपयोगी संच (भांडे) मोफत वाटप केली जातात. यापूर्वी पेट्या व गृहउपयोगी संच तालुक्याच्या ठिकाणी किवा कामगारांच्या राहत्या गांवात आणून दिले जात होते. परंतू कामगारांची फार लूट होत आहे म्हणून मंडळाने जिल्हा ठिकाणीच पेट्या व भांडे कामगारांना देण्याचा निर्णय घेतला आहे असे अधिकाऱ्यांकडून बोलते जाते.

गृहउपयोगी संच आणणे प्रत्येक कामगाराम अत्यंत त्रासदायक आहे.संच वाटप केंद्र बीडपासून आठ किलोमीटर दूर आहे व रिक्षा किमान ५०० रु. घेतो. जिल्हयातील बांधकाम कामगारांना संच मिळण्यासाठी तालुक्याप्रमाणे वार ठरवून दिले आहेत परंतू जिल्हयातील सर्व ठिकाणचे कामगार रोज येतात. आलेले कामगार कोणाचेच ऐकत नाहीत. वाटप कंत्राटदार हातबल आहे. कोणत्याही अधिकाऱ्याचा कसलाच प्रभाव नाही व कामगार ऐकतच नाहीत. संघटनेने परळीतून मोठे टेम्पो भरून ११० कामगार बीडला नेले होते, कामगार घरून सकाळी ८ वाजता निघाले व रात्री ११ वाजता परळीत आले. कामगारांना त्यांच्या जवळची भाकरी खाता आली नाही.कामगारांबरोबर प्रा. खाडे, शेख जावेद, शेख अजहर, शेख नवीद, प्रकाश वाघमारे, बाबा रोडे, प्रमुख कार्यकर्ते होते. त्यांनी भरपूर मेहनत घेतली. एका कामगाराला स्वतंत्र भांडे आणण्यास अनाठायी खर्च होतो.बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून कामगारांना मोफत भांडे वाटप आहे अशी जागृति निर्माण करावी तसेच सामाजीक कार्यकर्त्यांकडून लूट होणार नाही याचा प्रयत्न करावा. तसेच सुरक्षा संच व गृहउपयोगी संच किमान तालुक्याच्या ठिकाणी आणून द्यावेत ही बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटनेची मागणी आहे. ***

सा.परळी परिसर
वार्षिक वर्गणीदार व्हा!
- अंकासाठी संपर्क -
मो.९४२२३२८४९३

# अशोक नावंदे यांनी अनावश्यक खर्च टाळून सामाजिक बांधिलकी जपत केला वाढदिवस साजरा

परळी वैजनाथ/ प्रतिनिधी

तालुक्यातील संगम जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक अशोक नावंदे यांचा वाढदिवस बुधवार दिनांक ३ जुलै रोजी विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. जि.प.प्राथमिक शाळा संगम येथे वृक्षारोपण तसेच प्राथमिक शाळेतील विद्यार्थी यांना शालेय साहित्य वही पेन खाऊ वाटप करून साजरा करण्यात आला.केले. शाळेतील विद्यार्थी व शाळेच्या अडचणी जाणून घेतल्या. शाळेच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न व मदत केली जाईल. तसेच सर्वांनी वाढदिवस साजरे करताना समाजिक उपक्रम राबवावेत अशी मनोकामना अशोक नावंदे यांनी व्यक्त केली.

बीड जिल्हा परिषदेचे आदर्श शिक्षक तथा जि.प.प्रा.शा. संगम शाळेचे मुख्याध्यापक अशोक नावंदे हे आपला वाढदिवस दरवर्षी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून करत असतात. त्याचप्रमाणे दि. ३ जुलै २०२४ रोजी ही त्यांनी स्वतःचा वाढदिवस इतर कुठलाही खर्च न करता विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करून साजरा केला. दरम्यान या शाळेतील सर्व शिक्षकही आपला वाढदिवस अशाच प्रकारे इतर बाबीवर खर्च न करता शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून करत असतात.

विद्यार्थीही अशा उपक्रमामुळे शिक्षकांच्या वाढदिवसाची आठवण ठेवतात एवढेच नाही तर विद्यार्थीही आपल्या परिसरातील मिळणाऱ्या फुले , पाने यापासून पुष्पगुच्छ तयार करून आणतात व शिक्षकांचा आपुलकीने वाढदिवस साजरा करतात तसेच शाळेच्या वतीनेही विद्यार्थ्यांना वही, पेन, चॉकलेट देऊन विद्यार्थ्यांचाही वाढदिवस नियमितपणे साजरा केला जातो. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या सर्व उपक्रमात शिक्षक सर्वश्री महादेव गित्ते सर,सुभाष कोंकेवाड सर,शिक्षकी श्रीमती कल्पना बडे मॅडम, बबिता शिंदे यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले होते. ***

# पाऊले चालती पंढरीची वाट.!




आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला देवशयनी एकादशी म्हणून ओळखले जाते. तसेच काही ठिकाणी पद्मनाभा या नावाने संबोधले जाते. महाराष्ट्रात आषाढी एकादशीचे विशेष महत्त्व आहे. एकादशीची तिथी ही प्रत्येक महिन्यात दोनदा येते. कृष्ण पक्षात आणि शुक्ल पक्षातील एकादशीच्या दिवशी भगवान विष्णूच्या विविध रुपांचे दर्शन आपल्याला होते. आषाढ महिन्यात येणारी एकादशी ही अधिक महत्त्वाची मानली जाते.

एकादशीची तिथी ही प्रत्येक महिन्यात दोनदा येते. कृष्ण पक्षात आणि शुक्ल पक्षातील एकादशीच्या दिवशी भगवान विष्णूच्या विविध रुपांचे दर्शन आपल्याला होते. आषाढ महिन्यात येणारी एकादशी ही अधिक महत्त्वाची मानली जाते.

आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला देवशयनी एकादशी म्हणून ओळखले जाते. तसेच काही ठिकाणी पद्मनाभा या नावाने संबोधले जाते. महाराष्ट्रात आषाढी एकादशीचे विशेष महत्त्व आहे. या दिवशी विठ्ठलाची ओढ लागलेले वारकरी पंढरपुरात विठू माऊलीचे दर्शन घेण्यासाठी जातात. राज्यातील विविध भागातून लाखों वारकरी पायी पंढरपूरला जातात. तसेच अनेक संतांच्या पालख्या विविध ठिकाणाहून पंढरपूरात मार्गस्थ होतात. विठ्ठनामाचा गजर, टाळ-मृदुंग वाजवत वारकरी विठ्ठलाचे दर्शन घेतात. जाणून घेऊया यंदा आषाढी एकादशीची तिथी, शुभ मुहूर्त आणि महत्त्व

**१. आषाढी एकादशी तिथी आणि शुभ मुहूर्त :-** हिंदू पंचांगानुसार आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला देवशयनी, पद्मनाभा किंवा आषाढी एकादशी साजरी केली जाईल. यंदा आषाढी एकादशीची तिथी १७ जुलैला असणार आहे. हिंदू पंचांगानुसार एकादशीची तिथी ही १६ जुलैला रात्री ८ वाजून ३३ मिनिटांनी सुरु होईल तर १७ जुलैला रात्री ९ वाजून ३३ मिनिटांनी संपेल. उदय तिथीनुसार आषाढी एकादशीची ही तिथी १७ जुलैला साजरी करण्यात येईल.

**२. आषाढी एकादशी शुभ योग :-** आषाढी एकादशीच्या दिवशी अनुराधा नक्षत्र असून सर्वार्थ सिद्धी, अमृत सिद्धी योग, शुभ योग आणि शुक्ल योगाचा संयोग असणार आहे. या काळात तुम्ही धार्मिक कार्यासोबत अनेक महत्त्वाची कामे केल्याने लाभ होतील.

**३. आषाढी एकादशी व्रत पारायण :-** देवशयनी एकादशीचे व्रत हे १८ जुलैला दुसऱ्या दिवशी सोडले जाईल. व्रत सोडण्याची शुभ वेळ ही सकाळी ५ वाजून ३४ मिनिटांपासून ते ८ वाजून १९ मिनिटांपर्यंत असेल.

**४. आषाढी एकादशीचे महत्त्व :-** आषाढी एकादशीची तिथी संपल्यानंतर चातुर्मास सुरु होतो. या दिवसापासून पुढील चार महिने भगवान विष्णू निद्रावस्थेत जातात. या काळात शुभ कार्य करणे वर्ज्य मानले जाते.

पुराण काळानुसार श्रीविष्णुंनी या दिवशी वामन अवताराचे रुप धारण करुन बळी राजाला पाताळात जाण्यास सांगितले. तसेच बळी राजाला त्याच्या राज्याचे संरक्षण करण्याचे वचनही दिले. बळी राजाला दिलेले वचन पाळण्यासाठी श्रीविष्णू द्वारपाल म्हणून पाताळात जातात. हा काळ आषाढी एकादशीपासून ते कार्तिक एकादशीचा मानला जातो. भगवान विष्णू आषाढी एकदाशीच्या दिवशी बळी राज्यात जातात आणि कार्तिक एकादशीला क्षीरसागरात परतात अशी मान्यता आहे. ***

# महाराष्ट्रातील झिका विषाणू संसर्गाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून मार्गदर्शक नियमावली




नवी दिल्ली :- महाराष्ट्रात झिका विषाणू संसर्गाच्या घटनांची वाढ होत असल्याच्या वृत्ताच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने राज्यांसाठी विशेष मार्गदर्शक नियमावली जारी केली आहे. आरोग्य सेवा महासंचालक डॉ. अतुल गोयल यांनी झिका विषाणूच्या स्थितीवर सतत लक्ष ठेवण्याची गरज अधोरेखित केली आहे.

**गरोदर मातांसाठी विशेष सूचना:-** राज्यांना गरोदर मातांची झिका विषाणू संसर्गाच्या दृष्टीने तपासणी करून सतत दक्ष राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. झिका विषाणू संसर्ग झालेल्या गरोदर महिलांच्या गर्भाच्या वाढीवर लक्ष ठेवण्याचे आदेश असून, राज्यांनी बाधित भागातील आरोग्य सुविधा केंद्रांना झिका विषाणू संसर्गासाठी गरोदर महिलांची तपासणी करण्याचे आणि विषाणू संसर्ग झालेल्या मातांच्या गर्भाच्या वाढीवर लक्ष ठेवण्याचे निर्देशही दिले आहेत.

**आरोग्य सुविधा आणि देखरेख :-** आरोग्य सुविधांनी आपल्या परिसरात एडीस डासापासून मुक्त ठेवण्यासाठी एका नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, राज्यांनी निवासी भाग, कामाची ठिकाणे, शाळा, बांधकाम स्थळे, संस्था आणि आरोग्य सुविधांमध्ये कीटकशास्त्रीय देखरेख बळकट करावी आणि रोगवाहक सूक्ष्मजीव प्रतिबंधक उपक्रम जास्तीत जास्त प्रमाणात राबविण्याबाबत प्रसिध्दी पत्रकात म्हणटले आहे.

**जनजागृती आणि आयईसी संदेश :-** समाजामध्ये भीती कमी करण्यासाठी आणि जनजागृती वाढवण्यासाठी सोशल मीडिया आणि इतर मंचांवर सावधगिरीचे आयईसी संदेश देण्याचे आवाहन राज्यांना करण्यात आले आहे. झिका विषाणूचा संबंध गर्भाच्या वाढीशी असल्याने विशेष काळजी घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

**झिका विषाणू चाचणी सुविधा :-** झिका चाचणी करण्याची सुविधा नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी (छखत), पुणे, राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र (छद्रउ), दिल्ली आणि इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (खउचठ) च्या निवडक विषाणू संशोधन आणि निदान प्रयोगशाळांमध्ये उपलब्ध आहे.

**झिका विषाणू विषयी माहिती :-** झिका हा डेंग्यू आणि चिकुनगुनिया सारखा एडिस डासांमुळे पसरणारा विषाणूजन्य आजार आहे. हा आजार विशेष घातक नसला तरी झिका प्रभावित गर्भवती महिलांमध्ये जन्मलेल्या बाळांच्या मायक्रोसेफली (मेंदूचा आकार लहान असणे) या स्थितीशी संबंधित आहे. भारतात २०१६ मध्ये गुजरात राज्यात प्रथम झिका विषाणूच्या संसर्गाची नोंद झाली होती. २०२४ मध्ये (२ जुलैपर्यंत) महाराष्ट्रात पुणे (६), कोल्हापूर (१) आणि संगमनेर (१) येथे झिका विषाणूच्या ८ रुग्णांची नोंद झाली आहे. ***